ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

Indian Streams Research Journal

# महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांच्या शिक्षण व प्रशिक्षण विषयक कार्याचे मुल्यमापन

कु. सरस्वती हेमराजसिंह बिनवार[१] , डॉ. अरविंद शेंडे[२]
[१]संशोधनकर्ती , एम.कॉम.एम.ए.एम.फिल.बि.एड्. जी.डी.सी. ॲन्ड ए.
[२]मार्गदर्शक , प्राचार्य , कमला नेहरु महाविद्यालय सक्करदरा चौक, नागपूर.

**सारांश**

प्रस्तुत अध्ययनाचे शिर्षक महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे संस्था यांचे शिक्षण, प्रशिक्षणात पुणे जिल्हयातील योगदान हा असून सहकारी प्रबंध संस्थान मध्ये नागपूर जिल्हयाच्या योगदानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आली होती. हया शोधनिबंधाचा अभ्यास पुणे जिल्हयाशी संबंधित आहे. विषयाशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तिंशी संपर्क साधून, प्रश्न विचारुन, मुलाखतीद्वारे आणि प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे माहिती संकलित करण्यात आली. पुणे जिल्हयातील ५० लाभार्थींची निवड करण्यात आली. प्राथमिक स्त्रोत संकलित करतांना अध्ययनाशी संबंधित असणाऱ्या, संशोधन समस्येचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तिंशी संपर्क प्रस्थापित करुन तथ्य संकलित केल्या गेले.



व्यवहारासाठी कर्मचाऱ्यांचा काय प्रतिसाद मिळतो. संशोधनकर्त्यांनी प्रश्नावली व मुलाखतीच्या आधारे संकलित केली असून त्यासाठी ५० प्रतिशत कर्मचाऱ्यांनी निवड केली व त्याच्याकडून मिळालेले अभिप्राय नमुद केलेले आहे. तसेच संस्थेच्या अधिकारी पदाधिकारी वर्गाचे कार्यासंबंधी अभिप्राय प्रस्तुत केले आहेत.

१)कर्मचाऱ्याच्या दृष्टीकोनातुन अभिप्राय
२)अधिकऱ्याच्या दृष्टीकोनातून अभिप्राय

संस्थेच्या शिक्षण-प्रशिक्षणामार्फत कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत व तसेच ज्ञानासंबंधी संस्थांनी केलेल्या कार्यासंबंधी संकलित केलेल्या माहितीचे प्रथम कर्मचाऱ्यांच्या दृष्टीकोनातून मुल्यांकन करीत आहे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे या शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला १०० वर्षे पुर्ण झाली आणि अनेक अडचणींवर मात करुन ध्येयवादाचे सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सहकारी चळवळीचे प्रबोधन अविरतपणे सुरु ठेवले आहे. आणि या अविरत प्रबोधन सुरु ठेवण्याचे श्रेय जाते. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे येथील कार्यकर्त्यांना, पुढाऱ्यांना, सहकारी चळवळीची गुणवत्ता वाढविण्यासाठी सहकारी संख्यांचे व्यवस्थापन शिक्षण, प्रशिक्षण प्रचार, प्रसिद्धी सहकारी कार्यकर्त्यांचा मोठा सिहांचा वाटा आहे. म्हणूनच आज या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यात अधिकाधिक प्रमाणात संख्यात्मक व गुणात्मक प्रमाणात वाढ व्हावी म्हणून आज यांचा अभ्यास करण्यासाठी गरज भासु लागली आहे. तसेच शिक्षण, प्रशिक्षणाचे कार्य सुरळीतपणे सुरु आहे कि नाही त्यांनी योजलेल्या हितसंबंधासाठी योजनांची आखणी करुन प्रभावी यशस्वी अंमलबजावणी करते अथवा नाही. तसेच संस्थेच्या आर्थिक

**सारणी क्र. १ लाभार्थींच्या कार्यक्षमतेबाबत सारणी**

ज्या ५० कर्मचाऱ्याची निवड करण्यात आली त्यांच्या प्रशिक्षणामार्फत अभिप्राय.

| विवरण | प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| कार्यक्षमतेत वाढ झाली | ४५ | ९०% |
| कार्यक्षमतेत वाढ झाली नाही | ५ | १०% |
| **एकूण** | ५० | १००% |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, नमुन्यासाठी निवडलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ४५ कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत भर पडली आणि ५ कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर शिक्षणा प्रशिक्षणामूळे भर पडली नाही.

**सारणी क्र. २ शिक्षण प्रशिक्षणामार्फत सहकारितेच्या ज्ञानात भर पडली का? अथवा ज्ञानात वृध्दी झाली का?**

| अभिप्राय | प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | ४० | ८०% |
| नही | १० | २०% |
| **एकूण** | ५० | १००% |

शिक्षण प्रशिक्षणामूळे ४० कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात व सहकाराविषयी भर पडली आणि १० कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात सहकाराविषयी ज्ञानात भर पडली नाही.

**सारणी क्र. ३ शिक्षण प्रशिक्षणामुळे रोजगारास संधी प्राप्त झाली का? हे दर्शविणारे अभिप्राय.**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| रोजगार मिळतो | ३० | ६०% |
| रोजगार मिळत नाही | २० | ४०% |
| **एकूण** | ५० | १००% |

शिक्षण प्रशिक्षणामूळे ६० टक्के कर्मचाऱ्यांच्या रोजगारात भर पडली आणि ४० टक्के कर्मचाऱ्यांच्या शिक्षण प्रशिक्षणामार्फत रोजगारात संधी मिळाली नाही असे अभिप्राय प्राप्त झाले.

**सारणी क्र. ४ प्रशिक्षणामार्फत बढतीचे प्रमाण वाढते का त्याबद्दल कर्मचाऱ्यांचे अभिप्राय**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३५ | ७०% |
| नही | १५ | ३०% |
| **एकूण** | ५० | १००% |

वरील सारणीवरुन हे लक्षात येते की, प्रशिक्षणामुळे ७०% कर्मचाऱ्यांच्या बढतीचे प्रमाण वाढले आणि ३०% कर्मचाऱ्याचे असे मत आहे की, प्रशिक्षणामुळे त्यांच्या बढतीत बदल घडून आले नाही.

**सारणी क्र. ५ शिक्षण प्रशिक्षणाच्या प्रणालीमध्ये बदल करण्याची गरज आहे का?**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३५ | ७०% |
| नही | १५ | ३०% |
| **एकूण** | ५० | १००% |

वरील सारणीवरुन हे लक्षात येते की, ७०% कर्मचाऱ्यांना वाटते की प्रशिक्षण प्रणाली मध्ये बदल करण्याची गरज आहे. तसेच ३०% कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण प्रणालीमध्ये बदल करण्याची गरज वाटत नाही.

**सारणी क्र. ६ प्रशिक्षणामूळे दैनंदिन व्यवहार हाताळण्यास मदत प्राप्त होते का?**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मदत प्राप्त होते | २० | ४०% |
| मदत प्राप्त होत नाही | ३० | ६०% |
| **एकूण** | ५० | १००% |

४०% कर्मचाऱ्याच्या अभिप्राय प्रमाणे प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन व्यवहार हाताळण्यास मदत प्राप्त होते. तर ६०% कर्मचाऱ्यांना दैनंदिन व्यवहार हाताळण्यात मदत प्राप्त होत नाही असे अभिप्राय सारणी दर्शवित आहे.

१) महाराष्ट्र राज्य संघ, पुणे शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या कार्याचे मुल्यांकन करतांना ५० कर्मचाऱ्यांनी तर २५ अधिकाऱ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली कर्मचाऱ्यांचे संस्थेच्या कार्याबद्दल अभ्यास केल्यानंतर अधिकारी वर्ग संस्थेच्या कार्याबद्दल आपले मत प्रदर्शित करतांना हाती आले आणि अभिप्राय या ठिकाणी विचार करीत आहे.

२) नमुना म्हणून ज्या २५ अधिकाऱ्याची निवड करण्यात आली त्यांना संस्थेच्या कार्याबद्दल आपले अभिप्राय पुढील प्रमाणे व्यक्त केले.

**सारणी क्र. ७**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| संस्थेचे कार्य समाधानकारक आहे असे म्हणणारे अधिकारी | २२ | ८८% |
| संस्थेचे कार्य असमाधानकारक आहे असे म्हणणारे अधिकारी | ३ | १२% |
| **एकूण** | २५ | १००% |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ८८ अधिकाऱ्याच्या अभिप्रायाप्रमाणे संस्थेचे कार्य समाधानकारक आहे आणि १२ अधिकाऱ्यांना संस्थेचे कार्य असामाधान कारक वाटते. असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे.

**सारणी क्र. ८ प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थीच्या संस्थेत वाढ होत आहे काय? हे दर्शविणारे अधिकारी वर्गाचे अभिप्राय**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | २३ | ९२% |
| नही | २ | ८% |
| **एकूण** | २५ | १००% |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ९२% अधिकारी वर्गाच्या अभिप्रायाप्रमाणे प्रशिक्षणार्थींच्या संख्येत वाढ होते आणि ८% अधिकारी वर्गाला प्रशिक्षणामूळे प्रशिक्षणार्थींच्या संख्येत वाढ होत नाही असे वाटते.

**सारणी क्र. ९ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणामूळे संस्थेला फायदा होतो काय? हे अभिप्राय दर्शविणारी अधिकाऱ्यांची संख्या**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| कर्मचारी प्रशिक्षणामूळे संस्थेला फायदा होतो | २१ | ८४% |
| कर्मचारी प्रशिक्षणामुळे संस्थेला फायदा होत नाही. | ४ | १६% |
| **एकूण** | २५ | १००% |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, ८४% अधिकारी वर्गाच्या अभिप्रायाप्रमाणे कर्मचारी प्रशिक्षणामूळे संस्थेला फायदा होतो तसेच १६% अधिकाऱ्यांचे असे मत आहे की, सहकारी कर्मचारी प्रशिक्षणामुळे संस्थेला फायदा होत नाही.

**सारणी क्र. १० संस्थेचा आर्थिक व्यवहार समाधानकारक आहे का? हे दर्शविणाऱ्या अधिकारी वर्गाचे अभिप्राय**

| अभिप्राय | कर्मचाऱ्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| आर्थिक व्यवहार समाधानकारक आहे. | २५ | १००% |
| आर्थिक व्यवहार समाधानकारक नाही. | — | - |
| **एकूण** | २५ | १००% |

वरील सारणीवरुन असे लक्षात येते की, १००% अधिकाऱ्यांना संस्थेचे आर्थिक व्यवहार समाधानकारक वाटतात असे अभिप्राय त्यांनी प्रस्तुत केले.

## निष्कर्ष

सहकारी संस्थांकडे सभासद संख्येत सातत्याने वाढ होत आहे. अश्या संख्यात्मक विकासाबरोबर गुणात्मक विकास देखील सहकारी सभासदांचा झाला आहे. संस्थेचे कार्य आणि व्यवहार, निधीचा वापर, मालमत्तेचा वापर संचालक मंडळाची कार्यपद्धती, इत्यादीवर लक्ष देण्याचे कार्य सभासद करीत आहे. हे सर्व सहकार शिक्षण व प्रशिक्षणातून शक्य झाले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पूणे संस्थानने पुरविलेल्या शिक्षणाने सभासदांची, कर्मचाऱ्यांची तसेच संबंधित घटकांची जबाबदारीने वागण्याची कार्यक्षमता वाढली आहे. सहकारसंबंधीचे शिक्षण व प्रशिक्षणाने व्यवहार सुलभतेने तत्परतेने पार पाडणे, व्यवसायिक प्रथा पाळणे सहकारी तत्वांची व नियमांची पायमल्ली न करणे, ध्येय धोरणानुसार सर्व कामकाज चालविणे, सहकारी निधींचा वापर संस्थेच्या हितासाठीच करणे, मालमत्तेचा गैरवापर टाळणे, इत्यादी बाबतीत सर्वच घटकात जबाबदारीची भावना निर्माण होते.

## संदर्भग्रंथ


| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखक |
|---|---|---|
| १. | मराठी विश्वकोश | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ |
| २. | सामाजिक संशोधन पद्धती | डॉ. पु.ल. भांडारकर<br>दत्त प्रकाशन, सदर नागपूर |
| ३. | समाज शास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती | प्रा.रा.ना घाटोळे |
| ४. | हरविलेले नागपूर | सुरेश भुसारी<br>ज्ञानेश प्रकाशन, नागपूर |
| ५. | महाराष्ट्र १९९० | संतोष दास्ताने<br>रामदासपेठ, नागपूर |
| ६. | आपण नागपूर जिल्हा | महाराष्ट्र पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ २००१ |
| ७. | सहकाराची मूलतत्वे | मा.वि. मदाने |